ePaper

## ऑस्ट्रेलियाची विजयी हॅटट्रिक, टीम इंडिया 330 रन्स करुनही पराभूत

वर्ष - 9 । अंक -51 UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

### आतील पानांत


- ऑस्ट्रेलियाला दिली कडवी टक्कर
- विद्यार्थिनींनी उशिरा बाहेर पडू नये
- इंग्लंडच्या कर्णधाराने घडवला इतिहास!
- भाजपाला दिलं बरोबरीचं स्थान


www.mahaenews.com । सोमवार, दि. 13 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## भाजपवर सुप्रिया सुळे यांचा घणाघात! आता पक्षात ओरिजिनल राहिलेच कोण?

# भाजपचं काँग्रेसीकरण झालेय!

### सुसंस्कृत पक्षाची ओळख हरवली-नागपुरात राष्ट्रवादी खासदार सुप्रिया सुळे यांची टीका

। नागपूर । प्रतिनिधी । महाईन्यूज

**राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या राजकीय हालचालींना अधिक वेग आला आहे. विविध पक्षांतील नेते भाजप आणि महायुतीत प्रवेश करत असल्याने नव्या समीकरणांना जन्म मिळत आहे. अशा पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) च्या खासदार सुप्रिया सुळे यांनी रविवारी नागपुरात भाजपवर थेट घणाघात केला.**



“भाजपचं आता काँग्रेसीकरण झालं आहे. पक्षात ओरिजिनल राहिलेच कोण?” असा सवाल करत त्यांनी भाजपच्या कार्यपद्धतीवर आणि आजच्या नेतृत्वावर कठोर टीका केली.

**“भाजपचं काँग्रेसीकरण झालंय” — सुळे यांची टोलेबाजी**

नागपूर दौऱ्यावर असताना पत्रकारांशी संवाद साधताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, “स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर इतर पक्षांतील नेत्यांना महायुतीत घेतलं जात आहे. पण खरं पाहिलं तर आज भाजपमध्ये मूळ कार्यकर्तेच उरलेले नाहीत. संसदेत गेल्यावर व्हिजिटर गॅलरीतून पाहिलं तरी, भाजपच्या बाकांवर तुम्हाला इतर पक्षांतून गेलेल्या नेत्यांची संख्या जास्त दिसेल. मग ओरिजिनल भाजप कार्यकर्ते कुठे आहेत?”

**त्याच वेळी त्यांनी पूर्वीच्या भाजपची आठवणही करून दिली-**

“विरोधी पक्षात असताना भाजपच्या कार्यकर्त्यांनी लाठ्या-कोंड्या खाल्ल्या, सतरंज्या उचलल्या. त्यावेळी त्यांची विचारसरणी, सुसंस्कृत आचरण आणि लोकांशी असलेला संवाद पाहून आम्हालाही आदर वाटायचा. पण आज त्या सगळ्या मूल्यांची उणीव जाणवते.”

**“अटल-आडवाणींचा भाजप आता राहिलाच नाही”**

सुळे यांनी पुढे सांगितले, “मी संसदेत काम करत असताना अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण आडवाणी, सुषमा स्वराज यांसारख्या नेत्यांसोबत काम करण्याची संधी मिळाली. त्यांच्याकडून शिकायला मिळालं. तेव्हाचा भाजप सुसंस्कृत आणि तत्त्वनिष्ठ पक्ष होता. मात्र आता तसं वातावरण राहिलेलं नाही. आजचा भाजप ही केवळ सत्तेची भूक आणि सत्तेची आकांक्षा बाळगणारी संघटना बनली आहे.”

त्यामुळेच, “भाजपचं आता काँग्रेसीकरण झालं आहे” असा टोला त्यांनी लगावला.

**घायवळ बनावट पासपोर्ट प्रकरणावर सुळे यांची प्रतिक्रिया**

पत्रकार परिषदेत घायवळ बनावट पासपोर्ट प्रकरणाबद्दल विचारले असता सुळे म्हणाल्या, “या प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उशिरा का होईना, पण चौकशी करणार असल्याचं जाहीर केलं, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते. परंतु हा प्रकार अत्यंत गंभीर आहे.”

त्या म्हणाल्या, “शेतकरी बँकेत कर्ज मागायला जातो तेव्हा त्याला दहा प्रश्न विचारले जातात, त्याचे अर्ज फेटाळले जातात. पण एखादा गुंड बनावट पासपोर्ट तयार करून देशाबाहेर जाऊ शकतो, हे अत्यंत चिंताजनक आहे. पासपोर्ट आणि इमिग्रेशनच्या ठिकाणी इतकी सुरक्षा असताना असं कसं शक्य होतं?”

त्यांनी पुढे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली. “हा प्रकार देशाच्या सुरक्षेशी संबंधित आहे. त्यामुळे केवळ राज्य सरकार नव्हे, केंद्र सरकारनेही यात लक्ष घालणं आवश्यक आहे,” असं त्या म्हणाल्या.

**“राज्यात गुन्हेगारी वाढली, सरकार उत्तर द्यावं”**

राज्यातील वाढत्या गुन्हेगारीच्या घटनांवरही सुळे यांनी सरकारला धारेवर धरले. “राज्यात गुन्हेगारी वाढली आहे, हे रोजच प्रसारमाध्यमांमधून आणि पोलिसांकडून समोर येतं. विशेषतः पुण्यासारख्या शहरात गुन्ह्यांची वाढ चिंताजनक आहे. पुणे हे शिक्षणाचं माहेरघर म्हणून ओळखलं जातं, पण आता तिथेही गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. याची जबाबदारी राज्याचे गृहमंत्री घेणार का?” असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

**“राज्याची आर्थिक स्थिती बिकट”**

सुळे यांनी राज्य सरकारच्या आर्थिक धोरणावरही टीका केली. “राज्याची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस खालावत चालली आहे. स्वतः सरकारमधील मंत्रीही निधीत कपात झाल्याची तक्रार करत आहेत. जेव्हा मंत्रीच अशी ओरड करत आहेत, तेव्हा सामान्य जनतेला काय दिलासा मिळणार? हे अत्यंत चिंताजनक आहे,” असं त्या म्हणाल्या.

**“स्थानिक स्वराज्य निवडणुका कार्यकर्त्यांच्या”**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत विचारले असता सुप्रिया सुळे म्हणाल्या, “या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या असतात. आम्ही कधीच या निवडणुका महायुतीसोबत लढलेल्या नाहीत. त्यामुळे पुढे काय भूमिका घ्यायची, हा महायुतीचा विषय आहे. आमच्याकडे आमचे अधिकार आहेत आणि आमचे धोरण आहे. येत्या काळात सर्व स्पष्ट होईल.”

त्या पुढे म्हणाल्या, “राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उद्दिष्ट स्पष्ट आहे — आम्ही लोकांसाठी काम करणारे कार्यकर्ते घडवू इच्छितो. सत्तेसाठी नव्हे, सेवेसाठी राजकारण करणं हाच आमचा हेतू आहे.”

**“माझी शाळा” योजना थंड बस्त्यात – सरकारवर टीका**

राज्यातील शिक्षणविषयक योजनांवर बोलताना सुळे म्हणाल्या, “मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ‘माझी शाळा’ या योजनेवर आता लाल शेरा देण्यात आला आहे. हे राज्याच्या शिक्षणविषयक धोरणाचं अपयश दर्शवतं. योजना सुरू करून त्याचं योग्य नियोजन न करणं, हेच सरकारच्या अकार्यक्षमतेचं द्योतक आहे.”

**सुळे यांचा निशाणा थेट भाजप नेतृत्वावर**

नागपूरच्या या दौऱ्यात सुप्रिया सुळे यांनी अप्रत्यक्षपणे भाजपच्या शीर्ष नेतृत्वालाही लक्ष्य केले. “आजचा भाजप केवळ सत्तेवर राहण्यासाठी झटतो आहे. त्यात ना विचार उरला, ना संस्कार. विरोधकांची बदनामी करून आणि इतर पक्षांतील नेते ओढून आणून सत्तेवर टिकण्याचा प्रयत्न सुरू आहे. पण अशा पद्धतीने लोकांचा विश्वास टिकवणं शक्य नाही,” असा थेट घणाघात त्यांनी केला.

### “जनतेला ओरिजिनल पाहिजे, कॉपी नव्हे”

सुप्रिया सुळे यांच्या या वक्तव्यातून एक गोष्ट स्पष्ट होते — त्या सत्ताधाऱ्यांच्या आक्रमक राजकारणावर प्रहार करताना जुने मूल्य, तत्त्वनिष्ठ राजकारण आणि विचारांची भूमिका यावर भर देत आहेत. “जनतेला ओरिजिनल नेतृत्व हवं आहे, कॉपी नव्हे,” असं सुचवत त्यांनी केवळ भाजपलाच नव्हे, तर सत्तेत असलेल्या सर्व पक्षांना आरसा दाखवला आहे. राजकीय वर्तुळात सुळे यांची ही टीका चर्चेचा विषय ठरली असून, आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या वक्तव्याला मोठे राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.

महायुतीमध्ये दंगा नको हे मी रविंद्र धंगेकर यांना सांगितलं : शिंदे

# महायुतीमध्ये दंगा नको : उपमुख्यमंत्री

## धंगेकर यांच्यावर नवनवीन आरोप

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कोथरूडमध्ये मागील महिन्यात निलेश घायवळ टोळीतील दोघांनी गोळीबार केल्याची घटना घडली होती. त्या प्रकरणातील आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश आले. तर त्या घटनेनंतर निलेश घायवळ हा परदेशात पसार झाला. त्यानंतर शिवसेना शिंदे गटाचे नेते माजी आमदार रविंद्र धंगेकर यांनी निलेश घायवळ याला भाजपचे नेते चंद्रकांत पाटील आणि त्यांचे कार्यकर्ते सहकार्य करित असल्याचा आरोप केला. त्या संदर्भातील अनेक फोटो देखील समोर आणले. त्यावरून मागील आठवड्याभरापासून रविंद्र धंगेकर हे चंद्रकात पाटील यांच्यावर नवनवीन आरोप करीत टीका करित होते.**



या सर्व घडामोडी दरम्यान रविंद्र धंगेकर यांच्या मुलाचे गुंड गजा मारणेसोबतचे फोटो समोर आले. त्यावरून पुन्हा एकदा आरोप प्रत्यारोप सुरू होण्यास सुरुवात झाली होती. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविंद्र धंगेकर यांना समज द्यावी, अशी मागणी भाजपच्या स्थानिक नेत्याकडून करण्यात आली होती. त्याच दरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पुण्यात आज एका कार्यक्रमासाठी आले होते. त्यावेळी रविंद्र धंगेकर यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. त्यावेळी दोघांमध्ये काही मिनिटे चर्चा झाली.प्रसार माध्यमांशी संवाद साधताना एकनाथ शिंदे म्हणाले, महायुतीमध्ये दंगा नको, हे मी रविंद्र धंगेकर यांना सांगितले आहे. पुणे शहरात कायदा सुव्यवस्था अबाधित राहिली पाहिजे, सर्वसामान्य जनतेला कुठलाही त्रास होऊ नये. पुण्यातील मुली, महिला तसेच नागरिक यांना निर्भयपणे फिरता आले पाहिजे. कायदा सुव्यवस्था राखली गेली पाहिजे, अशी मागणी रविंद्र धंगेकर यांनी केली आहे. पण मी तुम्हाला यावर एकच सांगू इच्छितो की, गुन्हेगाराला क्षमा नाही. गुन्हेगार कोणीही असू द्या, त्याला पाठीशी घातलं जाणार नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली. कोथरूडमध्ये मागील महिन्यात निलेश घायवळ टोळीतील दोघांनी गोळीबार केल्याची घटना घडली होती. त्या प्रकरणातील आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश आले. तर त्या घटनेनंतर निलेश घायवळ हा परदेशात पसार झाला. त्यानंतर शिवसेना शिंदे गटाचे नेते माजी आमदार रविंद्र धंगेकर यांनी निलेश घायवळ याला भाजपचे नेते चंद्रकांत पाटील आणि त्यांचे कार्यकर्ते सहकार्य करित असल्याचा आरोप केला. त्या संदर्भातील अनेक फोटो देखील समोर आणले. त्यावरून मागील आठवड्याभरापासून रविंद्र धंगेकर हे चंद्रकात पाटील यांच्यावर नवनवीन आरोप करीत टीका करित होते.

या सर्व घडामोडी दरम्यान रविंद्र धंगेकर यांच्या मुलाचे गुंड गजा मारणेसोबतचे फोटो समोर आले. त्यावरून पुन्हा एकदा आरोप प्रत्यारोप सुरू होण्यास सुरुवात झाली होती. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविंद्र धंगेकर यांना समज द्यावी, अशी मागणी भाजपच्या स्थानिक नेत्याकडून करण्यात आली होती. त्याच दरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पुण्यात आज एका कार्यक्रमासाठी आले होते. त्यावेळी रविंद्र धंगेकर यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. त्यावेळी दोघांमध्ये काही मिनिटे चर्चा झाली.प्रसार माध्यमांशी संवाद साधताना एकनाथ शिंदे म्हणाले, महायुतीमध्ये दंगा नको, हे मी रविंद्र धंगेकर यांना सांगितले आहे. पुणे शहरात कायदा सुव्यवस्था अबाधित राहिली पाहिजे, सर्वसामान्य जनतेला कुठलाही त्रास होऊ नये. पुण्यातील मुली, महिला तसेच नागरिक यांना निर्भयपणे फिरता आले पाहिजे. कायदा सुव्यवस्था राखली गेली पाहिजे, अशी मागणी रविंद्र धंगेकर यांनी केली आहे. पण मी तुम्हाला यावर एकच सांगू इच्छितो की, गुन्हेगाराला क्षमा नाही.

### गुन्हेगाराला क्षमा नाही

कोथरूडमध्ये मागील महिन्यात निलेश घायवळ टोळीतील दोघांनी गोळीबार केल्याची घटना घडली होती. त्या प्रकरणातील आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश आले. तर त्या घटनेनंतर निलेश घायवळ हा परदेशात पसार झाला. त्यानंतर शिवसेना शिंदे गटाचे नेते माजी आमदार रविंद्र धंगेकर यांनी निलेश घायवळ याला भाजपचे नेते चंद्रकांत पाटील आणि त्यांचे कार्यकर्ते सहकार्य करित असल्याचा आरोप केला.

# जि.प.त शिकणारी मुलगी अमेरिकेत

## पुण्यातील अदितीची 'नासा' दौऱ्यासाठी निवड

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**अमेरिकेतील जगविख्यात अवकाश संशोधन संस्था नासाबद्दल अनेकांना कुतुहल वाटत असतं. पुण्याच्या भोर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या शाळेत (झेडपी) शिकणाऱ्या १२ वर्षांच्या अदिती पार्ठेची नासाच्या दौऱ्यासाठी निवड झाली आहे. अदिती पार्ठेचे कुटुंबिय अतिशय बिकट परिस्थितीतून वाट काढत तिचे शिक्षण करत आहेत.**



तिचे वडील हमालीचे काम करतात, घरात कुणाकडेही स्मार्टफोन नाही. अदितीने कधी ट्रेननेही प्रवास केलेला नाही. अशात आता ती थेट अमेरिकेचा दौरा करणार असल्यामुळे तिच्या पालकांसह जिल्हा परिषदेच्या शाळेलाही आनंद पारानिगुडघर येथील झेडपीच्या शाळेत जाण्यासाठी अदिती रोज सकाळी पायी ३.५ किमींचा प्रवास करते. सायंकाळी ५ वाजता शाळा सुटल्यानंतर पुन्हा तासभर पायी चालून घरी येते.

अदितीचे वडील पुण्याच्या मार्केट यार्डात हमालीचे काम करतात. तर आई गावाला राहते. भोर तालुक्यात मावशीच्या घरी राहून अदिती शिक्षण घेत आहे.

### दौऱ्यासाठी निवड कशी झाली?

एक सायकल आणि बॅग देण्यात आली आहे. तसेच तिच्या शाळेतील शिक्षिका वर्षा कुठवाड यांनी लॅपटॉपची मागणी केली आहे. त्या म्हणाल्या, अदिती क्रीडा, वक्तृत्व आणि नृत्यातही पारंगत आहे. तिच्यात काहीतरी वेगळेपण आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यासाठी, तसेच संशोधन वृत्ती विकसित होण्यासाठी पुणे जिल्हा परिषदेने विद्यार्थ्यांना अमेरिकेतील 'नासा', तसेच भारतीय अवकाश संशोधन संस्था (इस्त्रो) या अवकाश संशोधन संस्थांची भेट घडविण्याचा उपक्रम हाती घेण्यात आलेला आहे.

वर उरला नाही. अदितीच्या मुख्याध्यापकांनी जेव्हा तिला ही बातमी दिली तेव्हा तिच्या डोळ्यात अश्रू आले. माझ्या मावशीला ही बातमी सांगितल्यानंतर तिला काय बोलावे हे कळत नव्हते. मी आईला सकाळी फोन करून सांगितले की, मी अमेरिकेला जाणार आहे.अदितीची मावशी मंगल कंक यांनी सांगितले की, आम्ही लहानपणापासून अदितीला वाढवले. आमच्यापैकी कुणीही विमानही पाहिलेले नाही. आता अदिती एकट्याने एवढ्या लांब विमानातून प्रवास करणार आहे. आमच्यासाठी ही अभिमानाची बाब आहे. आमच्या गावात अनेक लोक हमालीचे काम करतात.

वाहतुकीला 'रम्बलर'चा अडथळा — वाहने पंचर होऊन अपघाताची शक्यता

# पिंपरी चिंचवडमध्ये पोलीसच असुरक्षित!

## जानेवारी ते सप्टेंबर या कालावधीत पोलिसांवर १३ हल्ले

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पोलीसच असुरक्षित झाल्याचे चित्र पिंपरी-चिंचवडमध्ये निर्माण झाले आहे. जानेवारी ते सप्टेंबर या कालावधीत पोलिसांवर १३ हल्ले झाले आहेत. ऑन ड्युटी पोलिसांवरील हल्ल्यांमध्ये वाढ होत आहे. वाहतुकीचे नियमन करताना तसेच सराईत गुन्हेगारांकडून पोलिसांवर हल्ला होत आहे. पोलीसच सुरक्षित नसल्याने सामान्यांचे काय? असा प्रश्नही केला जात आहे..**



वाहतुकीच्या व्यवस्थापनापासून मंत्र्यांच्या सुरक्षा, शहर, गाववस्त्यांवर गस्त, किरकोळ चोरट्यांपासून मोठमोठ्या गुन्ह्यांच्या तपासात पोलीस कार्यरत असतात. गुन्हेगारी रोखण्यासह कायदा-सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पोलीस सदैव तत्पर असतात. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला जातो. मात्र, कारवाईदरम्यान, काही मुजोर नागरिक पोलिसांशी हुज्जत घालतात. काहीजण पोलिसांवर हात उचलण्यासह धमकीही देतात. त्यामुळे समाजाची सुरक्षा करणारे पोलीसच सुरक्षित नाहीत. नुकतेच, ६ ऑक्टोबर रोजी दुपारी बावधन येथे चांदणी चौकात नाकाबंदी सुरू असताना कारचालकाने पोलीस कर्मचाऱ्याला मारहाण केल्याची घटना घडली.

पोलिसांनी तडीपार केलेले गुन्हेगार परवानगी न घेता, शहराच्या हद्दीत येतात. त्यांच्यावर कारवाईसाठी गेलेल्या पोलिसांवर गुन्हेगारांनी हल्ले केल्याच्या सर्वाधिक घटना आहेत. हे गुन्हेगार पोलिसांना थेट जिवे मारण्याची धमकी देतात.

वाहतुकीचे नियमन करणाऱ्या वाहतूक पोलिसांसोबत हुज्जत घालून त्यांच्या कामात अडथळा आणून मारहाण केल्याच्या घटना शहरात घडत आहेत. याचबरोबर पोलिसांना मारण्याची, नोकरी घालविण्याची, वर्दी उतरविण्याची धमकी देणे, वरिष्ठांकडे, राजकारण्यांकडे तक्रार करण्याची धमकी देण्याचे प्रकार घडत आहेत. नागरिकांच्या सुरक्षेसाठी २४ तास पोलीस सज्ज असतात. मात्र, पोलिसांवरील हल्ले दिवसेंदिवस वाढत आहेत. चालू वर्षात आतापर्यंत तब्बल १३ घटना घडल्या आहेत. यापूर्वी पोलिसांना शिवीगाळ, धक्काबुक्की च्या घटना घडत होत्या. आता थेट मारहाणीचेही प्रकार घडू लागले आहेत. पोलिसांवरच गुन्हेगार हात उचलू लागल्याने सामान्य नागरिकांचे काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### महिनानिहाय पोलिसांवर झालेले हल्ले

| | |
|---|---|
| जानेवारी ३ | जून ० |
| फेब्रुवारी १ | जुलै २ |
| मार्च ० | ऑगस्ट १ |
| एप्रिल २ | सप्टेंबर १ |
| मे३ | एकूण १३ |

### पोलिसांशी हुज्जत घालून शिवीगाळ करण्याचे प्रकार वाढले

दुचाकीस्वार तसेच आलिशान कारमधून येणाऱ्यांकडून पोलिसांसोबत हुज्जत घालण्याचे प्रकार घडतात. स्वतः वाहतूक नियमांचे उल्लंघन करायचे आणि वाहतूक पोलिसांनी कायद्याचा बडगा उगारल्यास त्यांचा 'इगो' दुखावतो. पोलिसांकडून कारवाई केली जाण्याची बाब त्यांना सहन होत नाही. मग एखाद्या पुढाऱ्याला फोन लावण्यासह मोठमोठ्या ओळखी सांगितल्या जातात. तरीही, पोलीस रीतसर कायदेशीर कारवाई करण्यास गेल्यास त्यांच्यासोबत हुज्जत घालून शिवीगाळ करण्याबरोबरच मारहाण करण्यापर्यंत मजल जाते.

# पिंपरी महापालिका आरोग्य रँकिंगमध्ये अव्वल

## प्रथम क्रमांक मिळवित सलग पाचव्यांदा राज्यात अव्वलस्थानी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील एकूण २७ महापालिकांना मागे टाकत जुलै महिन्यात ४४.८५ गुणांसह पिंपरी-चिंचवड महापालिकेने पहिला क्रमांक पटकाविला, तर ऑगस्ट ४३.०१ गुण मिळवून पुन्हा आपले प्रथम स्थान अबाधित ठेवले आहे.**




या रँकिंगमध्ये मातृत्व आरोग्य, बाल आरोग्य, लसीकरण, कुटुंब नियोजन, किशोरवयीन आरोग्य, पीसीपीएनडीटी आरसीएच पोर्टल, आयडीएसपी, क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम, रेबीज नियंत्रण कार्यक्रम, कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम, डेंग्यू व मलेरिया नियंत्रण, असंसर्गजन्य आजार नियंत्रण, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, गुणवत्ता पूर्ण आरोग्यसेवा मानांकन, ई-औषधी, मोफत निदानसेवा, आयुष्मान भारत-आरोग्य व आरोग्य कल्याण केंद्रे, एचआयव्हीएस, आशा कार्यक्रम तसेच प्रशासन व वित्तीय व्यवस्थापन अशा निर्देशकांचा समावेश होता. आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे म्हणाले, प्रत्येक स्तरावर काम करणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांपासून रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांपर्यंत सर्वांचा सहभाग महत्त्वाचा ठरला आहे. ही कामगिरी प्रत्येकासाठी अभिमानाची आहे. आगामी काळात आणखी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून आपण ही कामगिरी टिकवून ठेवू.

"ही रँकिंग केवळ आकडेवारी नाही, तर आपल्या कार्यसंस्कृतीची आणि आरोग्य सेवेकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाची पावती आहे. नागरिकाभिमुख धोरणे, सातत्यपूर्ण तपासणी, लसीकरण, महिलांचे व बालकांचे आरोग्य, संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोगांवर नियंत्रण यामध्ये आम्ही सातत्याने लक्ष केंद्रित केले आहे."

**-विजयकुमार खोराटे,**
अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

**सलग पाचव्यांदा राज्यात प्रथम क्रमांक जुलै-ऑगस्ट 2025 आरोग्य रँकिंगमध्ये मिळविले अव्वलस्थान**

**आरोग्य सेवा, लसीकरण, मातृत्व-बालक आरोग्य, क्षयरोग व डेंग्यू नियंत्रणात उल्लेखनीय कामगिरी**




# माध्यमांची परीक्षा पाहणाऱ्या कलाकृती

**कुठल्याशा विद्यापीठात कलाविषयक अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा भाग म्हणून सादर झालेल्या कलाकृतींनी समजा कुणाच्या भावना दुखावल्या तर काय होतं, याचं प्रस्तुत लेखकानं अगदी जवळून पाहिलेलं उदाहरण २००७ सालच्या मे महिन्यातलं.**

बडोदे इथल्या महाराजा सयाजीराव विद्यापीठाच्या दृश्यकला विभागात शिल्प, रंगचित्र, मुद्राचित्रण अशा उपविभागांमध्ये पदवी आणि पदव्युत्तरच्या अखेरच्या वर्षीच्या परीक्षेचा भाग म्हणून, या परिसरातली एखादी जागा निवडून परीक्षार्थींना आपापल्या कलाकृतींचं छोटेखानी प्रदर्शन मांडावं लागतं. बाहेरचे परीक्षक या कलाकृती पाहतात, त्याबद्दल संबंधित परीक्षार्थीची (उद्याच्या कलावंताची) भूमिका जाणून घेण्यासाठी त्या परीक्षकांकडून मुलाखत घेतली जाते.. शिवाय कोणाही कलारसिकांना पाहण्यासाठी हे परीक्षाप्रदर्शन खुलंच असतं, अशी पद्धत अनेक वर्षांची. पण २००७ पासनं तिच्यात बदल झाला. कोणता बदल, ते नंतर पाहू. बदलच करावा लागण्यासारखं काय घडलं, ते आधी सांगतो. त्या वर्षी, मुद्राचित्रण शिकणारा एक विद्यार्थी चंद्रमोहन यानं येशू, दुर्गा यांच्या रूढ प्रतिमांना मानवदेहाच्या वाट्याला निसर्गानं दिलेले भोग (उत्सर्जन, जनन) जर आले तर काय होईल, अशा प्रकारची कल्पना करून तीवर



आधारित कलाकृती केल्या होत्या. कल्पना किती ताणावी, कुठे थांबावं हे या परीक्षार्थीला कळत नाही, हे त्याच्या कलाकृतींतून दिसत असल्याचं माझं प्रथमदर्शनी मत झालं. पण मुद्राचित्रण विभागातला असूनही त्यानं शिल्पं, मांडणशिल्प केली आहेत, हे पाहता या तरुणाचा कामाचा उत्साह भरपूर असणार हे अधिक प्रकर्षानं दिसत होतं आणि त्या उत्साहाच्या भरात आशयाकडे दुर्लक्ष झालं असेल, असं मानायला जागा होती. ही 'मानायला जागा' जी असते, ती खूप-खूप महत्त्वाची असते. ज्याला कलावंताचा कलेचा 'अवकाश' असं म्हटलं जातं ती ही जागा असते. तो अवकाश किती संकुचित आहे आणि फक्त 'कलाकृतीत देव दिसतायत आणि तेही काहीतरी घाणेरडं करताना दाखवले आहेत' एवढंच पाहून या अख्ख्या परीक्षाप्रदर्शनावर घाला आणला जातो आहे, संबंधित विद्यार्थ्याला अटक होते आहे (पुढे जामीनही मिळत नाही), त्यानं ज्या भागात स्वत:च्या परीक्षा-कलाकृती ठेवल्या त्या खोल्याच 'मुद्देमालासह सीलबंद' केल्या जाताहेत, या निमित्तानं या विद्यापीठाच्या अख्ख्या कलाविभागाला आणि विशेषत: तिथल्या काही पुरोगामी शिक्षकांना 'कुजबुज ब्रिगेड'च्या हल्ल्याचं लक्ष्य बनवलं जात आहे , असा अनपेक्षित घडनाक्रम घडत गेला. राज्य गुजरात, शहर बडोदे आणि सन २००७ हा स्थळकाळसंदर्भ पुरेपूर अंगी बाणलेले असे जे बडोदेवासी काहीजण होते, त्यापैकी काही 'हितचिंतकां'नी संबंधित विद्यार्थ्याला सांगितलंही होतं म्हणे- "तुझ्यामुळे सगळे गोत्यात येतील, असं नको करू". पण त्याला तो सल्ला कळला नाही आणि व्हायचं ते झालं. यामागे जो सत्ताधारी, शिरजोर पक्ष कार्यरत होता त्यातल्या एका तत्कालीन वकील-कार्यकर्त्यानं, विशेषत: प्रादेशिक भाषांतल्या आणि त्यातही विशेषत: टीव्ही चॅनेलच्या पत्रकारांना आत नेऊन, 'हा पाहा केवढा अपमान धर्माचा, केवळ आपल्याच नव्हे, त्यांच्याही धर्माचा..' अशी कॉमेंट्री आरंभल्याचाही अनुभव प्रस्तुत लेखकानं तेव्हा घेतला होता.'कलेच्या जागी कलेचीच चर्चा करा" हा जर दंडकिबडक असेल तर हा दंडक कोण, कसा नि किती पायदळी तुडवतंय याचा उत्तुंग वस्तुपाठ त्यातून मिळाला होता. हा प्रकार घडल्यानंतर विद्यापीठाच्या त्या विभागातलं वातावरण कलुषित झालं, लोकशाहीप्रेमी विद्यार्थ्यांनी पुढल्या शैक्षणिक वर्षातही विरोध सुरू ठेवला वगैरे.. आणि विद्यापीठाच्या कलाविभागानं परीक्षा-प्रदर्शनाचे नियमही बदलले. बाहेरून आलेल्या परीक्षक मंडळाचं काम पूर्ण झाल्यानंतरच, 'निवडक' कलाकृती सर्वांना पाहण्यासाठी खुल्या केल्या जाव्यात असा साधारण तो बदल होता. हे सारं पाळतशाहीकडे नेणारं आहे, हे तिथं त्यापुढल्या वर्षांमध्ये शिकणाऱ्या श्रेयस कर्ले याला उमगलं असावं. म्हणूनच तर त्यानं रॅकेल वगैरे भरण्यासाठी जे टिनाचं नरसाळं वापरतात तशाच आकाराची पण तीनतीन फुटांपर्यंत उंचीची नरसाळी उलटी ठेवलेली आहेत, त्यांच्या निमुळत्या नळकांडय़ांची टोकं करकरीत कोनामध्ये वाकलेली आहेत आणि त्या नळकांडय़ाच्या अगदी टोकाला भोक नसून, डोळा लावलेला आहे.

## प्रासंगिक »

# विक्राळ अंतराळ

***पृथ्वीवरील संघर्षांत नाही म्हणायला तहनामे, करार, शस्त्रबंदी आदी उपाय उपलब्ध तरी आहेत. अंतराळाच्या बाबतीत अद्याप तसले काही अस्तित्वातच नाही.***

तिसरे महायुद्ध कोणत्या शस्त्रांनिशी लढले जाईल हे सांगता येत नाही. पण चौथे महायुद्ध काठ्या-दगडांनिशी लढले जाईल हे नक्की..' हे उद्गार आहेत, दुसऱ्या महायुद्धाचा विध्वंस आणि अण्वस्त्रयुगाची नांदी यांचे साक्षीदार राहिलेले विख्यात शास्त्रज्ञ अल्बर्ट आइन्स्टाइन यांचे. शस्त्रास्त्रे आणि वर्चस्ववादाची कधीही न शमणारी भूक एक दिवस आधुनिक मानवाला एखाद्या संहारपर्वानंतर आदिमानवावस्थेकडे घेऊन जाईल, याविषयी त्यांना खात्री असावी. त्यांना 'न उमगलेले' तिसरे महायुद्ध कदाचित पृथ्वीतलावर लढले जाणारही नाही. ते कसे, याची कल्पना यावी यासाठी एका बातमीचा दाखला देणे आवश्यक ठरते. अमेरिकेत व्हाइट हाउस प्रवक्त्याने परवा एक निवेदन जारी केले, ज्यात रशियाने विकसित केलेल्या एका गूढ कृत्रिम उपग्रहविरोधी अस्त्राचा (अँटी-सॅटेलाइट वेपन) उल्लेख आहे.

मागील महिन्यात केंद्र शासनाने कोचिंग क्लासेस व्यवसायासाठी नियमावली तयार करण्यासंदर्भात राज्यांना काही मार्गदर्शक सूचना दिल्या. त्यामध्ये १६ वर्षांखालील विद्यार्थ्यांसाठी कोचिंग क्लासेस असू नयेत, अशी महत्त्वपूर्ण सूचना केंद्र शासनाने राज्यांना केलेली आहे.

# कोचिंग क्लासेसना 'स्टार्टअप' दर्जा द्या

मुळात कोट्यवधी रुपयांचे बजेट असलेली शासनाची शिक्षण व्यवस्था अस्तित्वात असताना कोचिंग क्लासेसची गरजच का पडावी याचा विचार सर्वप्रथम करणे गरजेचे आहे. याला कारणीभूत आहे शासनाची शैक्षणिक व्यवस्था, ज्यामध्ये विद्यार्थ्यांचे व पालकांचे समाधान होत नाही, तर दुसरीकडे वाढलेली जिवघेणी शैक्षणिक स्पर्धा व पालकांच्या अतिमहत्त्वाकांक्षा.३०-४० वर्षांपूर्वी अभ्यासात कमकुवत असलेले १० टक्के विद्यार्थी कोचिंग क्लास लावायचे. आता शासनाच्या शिक्षण व्यवस्थेत ९० टक्के विद्यार्थी कमकुवत असतात आणि म्हणून ते कोचिंग क्लासला जातात. कोचिंग क्लासेस चालवणारे शिक्षक सुशिक्षित आहेत, परंतु त्यांच्या हाताला काम नसल्यामुळे ते बेरोजगार आहेत, त्यामुळे ते इमानी इतबारे सकाळी सहापासून व्यावसायिक भूमिकेतून कोचिंग क्लासेस चालवतात. खासगी व्यवसाय असल्यामुळे व्यवसायवाढीसाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधा



ते स्वत:च उभ्या करतात. जो तो आपल्या कुवतीप्रमाणे जाहिरात तंत्राचा वापर करून आपला व्यवसाय वाढवण्याचा प्रयत्न करतो. खासगी कोचिंग क्लासेस संचालकांच्या सचोटीमुळे आणि त्यांच्या कौशल्यांमुळे पालक त्यांच्याकडे आकृष्ट होतात व आपल्या पाल्यासाठी स्वेच्छेने खर्च करतात. सुरुवातीला साधारणपणे उदरनिर्वाहाचे साधन म्हणून एक शिक्षकी कोचिंग क्लास सुरू होतो. पुढे त्या क्लासचा नावलौकिक होतो व विद्यार्थीसंख्या वाढते. अनेक शिक्षकांना यातून रोजगार मिळतो. अनेक गृहिणी शिकवणी व्यवसायातून आपल्या कुटुंबाला हातभार लावतात. शासन एकीकडे स्वयंरोजगाराचा डांगोरा पिटते आणि दुसरीकडे कोचिंग क्लासेस संचालकांनी स्वत:च्या भरवशावर नावारूपास आणलेला व्यवसाय बंद करण्याचा विचार करते, हा कुठला न्याय? शासन स्तरावर कोचिंग क्लासेसची सकारात्मक बाजू केव्हा लक्षात घेतली जाईल?विद्यार्थ्यांच्या शाळांच्या वेळा सांभाळून सकाळी ६ पासून कोचिंग क्लासेसचा संचालक अभ्यासक्रम, चाचणीच्या वेळा, टेस्ट पेपर, विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवणे, पालक सभा आयोजित करणे यासारख्या शाळेला समांतर असलेल्या अनेक गोष्टी करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतो. अनेक आव्हानांना तोंड देत कोचिंग क्लासेस संचालक आपल्या व्यवसायाचा दर्जा उत्तम टिकवण्यासाठी प्रयत्न करतो, जर त्यांनी नावलौकिक मिळवला नाही तर त्यांच्याकडे कुठलाही पालक आपल्या पाल्याला पाठवणार नाही ही वस्तुस्थिती आहे. 'हाडाचा शिक्षक' ही संकल्पना कोचिंग क्लासेसमध्ये पाहायला मिळेल. पण नेमके शासनाचे या सर्व सकारात्मक बाबींकडे दुर्लक्ष होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥
आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## अतिवृष्टीने २२ जणांचा मृत्यू

## ५ हजार ६९७ घरांची पडझड

# अतिवृष्टीने पाच महिन्यांत 22 जणांचा मृत्यू!

## १ हजार ५९ जनावरे दगावली

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**जिल्ह्यात यंदा मान्सूनपूर्व व मान्सूनच्या परतीच्या पावसाने एप्रिल ते सप्टेंबर या पाच महिन्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या ढगफुटी सदृश पावसाने २२ जणांचा मृत्यू झाला तर ५ हजार ६९७ घरांची पडझड झाली. लहान-मोठे असे १ हजार ५९ जनावरे दगावली. शिवाय १३ हजार ८७९ कोंबड्या मृत्युमुखी पडल्या. जिल्हा प्रशासनाने संकलित केलेल्या माहितीनुसार ही आकडेवारी समोर आली आहे.**



जिल्ह्यास यंदा १ एप्रिल ते ३० सप्टेंबर दरम्यान अतिवृष्टी, पूर, वादळी पावसाचा तडाखा बसला. या पावसाचे प्रमाण नगर दक्षिण जिल्ह्यात अधिक होते. सर्वाधिक घरांचे नुकसान हे पाथर्डी तालुक्यात, १ हजार २० घरांचे झाले तर जामखेड तालुक्यात ९०६ घरांची पडझड झाली आहे. या पावसात ३ हजार १७१ घरांचे अंशत: तर २ हजार १७८ घरांचे नुकसान झाले. ६ ठिकाणी संपूर्ण घरांचे नुकसान झाले. यासह ३४२ ठिकाणी जनावरांचे गोठे पडले आहेत. यासह शेवगाव तालुक्यात सर्वाधिक लहान-मोठ्या ओढकाम करणारे ४१८ जनावरे दगावली असून, नगर तालुक्यात २९२ जनावउत्तर महाराष्ट्रातील नाशिक, जळगाव, धुळे व नंदूरबार या चारही जिल्ह्यांत यंदा अतिवृष्टीने मोठे नुकसान सोसावे लागणार आहे. जळगाव जिल्ह्यात सप्टेंबर महिन्यात ८१ हजारापेक्षा जास्त हेक्टर शेतीचे नुकसान झाले. यात ५४ हजार हेक्टरवरील कापूस पिकाचे सर्वात जास्त नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी जमीन खरवडून गेली आहे. नाशिक जिल्ह्यात दोन दिवसांच्या पावसाने मालेगाव आणि नांदगाव तालुक्यातील शेतीपिकांना याचा तडाखा बसला. मका, सोयाबीन, कांदा व कापूस पिकांचे नुकसान झाले. एकूण ६५ गावांमधील २० हजार २२२ शेतकऱ्यांचे १३ हजार ८०१ हेक्टरचे नुकसान झाले. तुलनेने धुळे, नंदूरबार जिल्ह्यात की पाऊस असून नुकसानही कमी आहे.जळगाव जिल्ह्याला अतिवृष्टी नवी नाही. यात भरडला गेला तो शेतकरी राजा. दरवर्षी सप्टेंबर, ऑक्टोबरमध्ये शेतकऱ्यांच्या ऐन हातातोंडाशी आलेला घास हिरावून जातो. यंदा तर अतिवृष्टीने कहरच केला आहे. अतिवृष्टीने अनेक शेतकऱ्यांची जमीन खरवडून गेली आहे. तर अनेक ठिकाणी शेतात पाणी साचलेले आहे. त्याचा अजूनही निचरा झालेला नाही. भडगाव, एरंडोल, पाचोरा, मुक्ताईनगर, पारोळा या तालुक्यांत सर्वाधिक नुकसान झाले आहे. शेतात शिरून सुमारे १५ हजार ४९१ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. भुसावळला तापी नदीचे पाणी शेतात शिरल्याने याठिकाणी

## कांदा व कापूस पिकांचे नुकसान

महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यात दोन दिवसांच्या पावसाने मालेगाव आणि नांदगाव तालुक्यातीलबसला. खानदेशातील जळगाव व धुळे जिल्ह्याला लागून असलेल्या या दोन्ही तालुक्यांतील मका, सोयाबीन, कांदा व कापूस पिकांचे नुकसान झाले. जिल्ह्यात एकूण ६५ गावांमधील २० हजार २२२ शेतकऱ्यांचे १३ हजार ८०१ हेक्टरचे नुकसान झाल्याची नोंद कृषी विभागाने केली आहे.

चार हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. मुक्ताइनगर, पारोळा येथे वादळीवाऱ्यासह अतिवृष्टीने सुमारे आठ हजार हेक्टर पिकांचे नुकसान झाले. भडगाव, पाचोरा तालुक्यात अतिवृष्टीने नद्या नाल्यानां पूर, शेतात पाणी, गावातील घरांमध्ये पाणी शिरले हाहाकार उडाला होता.भडगाव तालुक्यात ३५४ घर, व्यावसायीकांचे नुकसान झाले. आमडदे येथे केळी कपाशी, मका पिकांचे मोठे नुकसान आहे. येथीलच अनेक ठिकाणची जमीन खरवडून गेली आहे.जळगाव जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे पाच व्यक्तिंचा मृत्यू झाला. तर एक हजार ९२२ इतक्या पशुधनांचा मृत्यू झाला. त्यात ८६ मोठे तर १८० लहान पशुधन आहे. एकूण एक हजार ६८ घरे नष्ट झाली. तर जनावरांचे ५४ गोठ्यांचे नुकसान झाले. जिल्ह्यात घरात पाणी शिरलेले कुटुंबीय ६८७ आहेत. १८०० पेक्षा अधिक अन्न पाकिटे या कुटुंबांना पोहोचती करण्यात आली. जळगाव जिल्ह्यात एकूण ८० हजार ८२७ हेक्टर पिकांचे नुकसान झाले. यात सर्वाधिक नुकसान भडगाव (२२ हजार ४९३ हेक्टर) व एरंडोल (१५ हजार ४९१ हेक्टर) तर सर्वात कमी नुकसान रावेर (९३.५० हेक्टर) तालुक्यात झाले. कापसाचे सर्वाधिक नुकसान झाले असून पुढीलप्रमाणे, कापूस (५३ हजार ७१७ हेक्टर), मका (१८ हजार १४० हे.) सोयाबीन (तीन हजार ९२ हे.), ज्वारी (एक हजार ३४८), कांदा (५९३), भाजीपाला (३६), तूर (एक हजार २८५) इतर (८५० हे), ऊस (१९.२० हे.),

# नांदेडमध्ये भाजपचे पुढचे पाऊल!

## बैठकीनंतरचे चित्र, चव्हाण यांच्यासह सर्व आमदार सक्रिय

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या नियोजनासंदर्भात भाजपाने गेल्या आठवड्यात छत्रपती संभाजीनगरात विभागीय बैठक घेतल्यानंतर या पक्षाचे स्थानिक नेते आणि लोकप्रतिनिधींनी आता 'पुढचे' पाऊल टाकले आहे.**



या निवडणुकांत मोठे यश प्राप्त करण्यासाठी भाजपाने पक्षामध्ये आता स्थिरावलेल्या खासदार अशोक चव्हाण यांना 'फ्री हॅन्ड' दिला असून, त्यांच्यावर प्रामुख्याने नांदेड मनपा आणि नांदेड जिल्हा परिषदेची सत्ता मिळविण्याची जबाबदारी राहणार आहे.मुख्यमंत्री फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण आणि अन्य प्रमुख नेत्यांनी गेल्या शुक्रवारी मराठवाडा विभागाच्या राजधानीत जिल्हानिहाय बैठका घेऊन प्रत्येक जिल्ह्यातील स्थिती जाणून घेतली. नांदेड जिल्ह्यातून खासदार अशोक चव्हाण, राजेश पवार, तुषार राठोड, जीतेश अंतापूरकर, श्रीजया चव्हाण या आमदारांसह पक्षाचे निमंत्रित, आजी-माजी पदाधिकारी हजर होते. मित्रपक्षांशी युती करण्यासंदर्भातील निर्णय त्या-त्या ठिकाणची परिस्थिती पाहून स्थानिक नेत्यांनी घ्यावा, असे पक्षाकडून सांगण्यात आले.भाजपाच्या जिल्ह्यातील पाच आमदारांना आपापल्या मतदारसंघातील नगर परिषद, नगरपंचायतींच्या निवडणुकांचे नियोजन-व्यवस्थापन सांभाळावे लागणार आहे. हदगाव, कंधार, लोहा या विधानसभा मतदारसंघांमध्ये मित्रपक्षांचे आमदार आहेत. तेथे भाजपा स्वबळावर लढणार का, ते येत्या काही दिवसांत स्पष्ट होईल. नांदेड जिल्हा परिषद आणि नांदेड-

## दोन्ही मित्रपक्षांशी युती करू नका

दोन्ही मित्रपक्षांशी युती करू नका, असा सल्ला खासदार चव्हाण यांना निकटवर्तीयांनी दिला असला तरी अद्याप तसा निर्णय अधिकृतपणे झालेला नाही. पवार यांनीही शनिवारी आपल्या मतदारसंघातील दोन नगर परिषदांच्या निवडणुकांसंदर्भात बैठका घेऊन स्थानिक परिस्थितीचा आढावा घेतला.

वाघाळा मनपा या दोन मुख्य संस्थांमध्ये भाजपाला आजवर अनुक्रमे अध्यक्ष व महापौरपद कधीच मिळाले नव्हते. या पार्श्वभूमीवर या दोन्ही संस्थांच्या निवडणुकांचा भार अशोक चव्हाण व त्यांच्या चमूवर टाकला जाणार आहे.वरील संस्थांच्या निवडणुकांत भाजपासोबत युती करण्याच्या मुद्यावर राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेच्या स्थानिक नेत्यांनी अलीकडच्या काळात केलेली वक्तव्ये पाहता खासदार चव्हाण आणि त्यांचे सूर जुळण्यासारखे चित्र तयार झालेले नाही. खासदार चव्हाण व आमदार चिखलीकर यांच्यातील राजकीय वैमनस्य वेगवेगळ्या मुद्यांवरून गहिरे होत चालले आहे.

## वसतिगृहाचे नियम पाळावेत

## महाविद्यालयातील बलात्कारप्रकरणी ममतांचे वक्तव्य

# विद्यार्थिनींनी उशिरा बाहेर पडू नये

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी वसतिगृहाचे नियम पाळावेत आणि रात्री उशिरा बाहेर जाऊ नये, असे वक्तव्य पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी रविवारी केले. त्यांच्या या वक्तव्याने वाद निर्माण झाला असून भाजप, काँग्रेस, माकपच्या नेत्यांनी बॅनर्जी यांच्यावर टीका केली.**

## हवे तिथे जाण्याचा मूलभूत अधिकार



दुर्गापूर येथील एका खासगी वैद्यकीय महाविद्यालयात शिकणाऱ्या ओडिशातील एका विद्यार्थिनीवर शुक्रवारी रात्री मैत्रिणीबरोबर जेवायला बाहेर गेली असताना सामूहिक बलात्कार झाला. त्यावर प्रतिक्रिया देताना बॅनर्जी यांनी अशा प्रकारचे वक्तव्य केले. आपत्तीग्रस्त उत्तर बंगालमध्ये मदत आणि पुनर्वसन कामाचा आढावा घेण्यासाठी जाण्यापूर्वी त्या नेताजी सुभाषचंद्र बोस आंतरराष्ट्रीय विमानतळावर पत्रकारांशी बोलत होत्या. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थिनी, विशेषतः ज्या राज्याबाहेरून शिक्षण घेण्यासाठी पश्चिम बंगालमध्ये आल्या आहेत, त्यांनी वसतिगृहाचे नियम पाळणे अपेक्षित आहे. विद्यार्थिनींना हवे तिथे जाण्याचा मूलभूत अधिकार असला तरी त्यांनी उशिरा बाहेर पडणे टाळावे. प्रत्येक व्यक्तीच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी पोलिसांना काही मर्यादा आहेत. रात्री कोण घराबाहेर पडत आहे हे पोलीस अधिकाऱ्यांना माहीत नसते आणि ते प्रत्येक घराचे ते रक्षण करू शकत नाहीत, असे ममता म्हणाल्या.दरम्यान, मुख्यमंत्र्यांनी अशा गुन्ह्यांबद्दलच्या 'निवडक आक्रोशा'वर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि त्यांची तुलना बिहार, उत्तर प्रदेश आणि ओडिशामधील प्रकरणांशी केली. उत्तर प्रदेशात न्यायालयात जाताना पीडितांना जाळले जाते, ओडिशामध्ये, समुद्रकिनाऱ्यावर मुलींवर बलात्कार करण्यात आला, तिथे काय कारवाई करण्यात आली, असा प्रश्नही त्यांनी केला.बॅनर्जी यांनी ही घटना धक्कादायक असल्याचे सांगतानाच कोणत्याही आरोपीला सोडणार नसल्याचेही ठणकावले. तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे आणि पोलीस इतरांचा शोध घेत असल्याची माहितीदेखील त्यांनी दिली. खासगी महाविद्यालयांनी त्यांच्या परिसरात सुरक्षा निश्चित केली पाहिजे, असेही त्या म्हणाल्या.असलेल्या एका व्यक्तीलाही ताब्यात घेतले असल्याचे पोलिसांनी सांगितले. या आरोपींची ओळख पोलिसांनी उघड केलेली नाही. या सर्वांची कसून चौकशी सुरू असून त्यांचे मोबाइलही जप्त करण्यात आले आहेत. आरोपींनी पीडितेच्या मोबाइल फोनचा वापर करून दुसऱ्या आरोपीला घटनास्थळी बोलावले, ज्यामुळे त्यांना सर्व आरोपींचे मोबाइल क्रमांक ओळखण्यास मदत झाली. तसेच विद्यार्थिनीच्या मैत्रिणीचीही चौकशी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. वैद्यकीय विद्यार्थिनीवरील बलात्कारप्रकरणी आणि ममता बॅनर्जी यांच्या वक्तव्याप्रकरणी विरोधकांनी पश्चिम बंगाल सरकारवर जोरदार टीका केली. पश्चिम बंगाल गुन्हेगारांसाठी सुरक्षित आश्रयस्थान बनले आहे आणि राज्य आता महिलांसाठी सुरक्षित राहिलेले नसल्याचा आरोप भारतीय कम्युनिस्ट पक्षाने (मार्क्सवादी) केला. या प्रकरणातील आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, या मागणीसाठी विरोधी पक्ष भाजप आणि काँग्रेसने रविवारी पश्चिम बंगालमध्ये विविध ठिकाणी निदर्शने केली. भाजप समर्थकांनी आसनसोल दक्षिण पोलीस ठाण्यावर मोर्चा काढला आणि धरणे दिले. दोषींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी विरोधकांकडून करण्यात आली. दुर्गापूर येथील एका खासगी वैद्यकीय महाविद्यालयात शिकणाऱ्या ओडिशातील एका विद्यार्थिनीवर शुक्रवारी रात्री मैत्रिणीबरोबर जेवायला बाहेर गेली असताना सामूहिक बलात्कार झाला. त्यावर प्रतिक्रिया देताना बॅनर्जी यांनी अशा प्रकारचे वक्तव्य केले. आपत्तीग्रस्त उत्तर बंगालमध्ये मदत आणि पुनर्वसन कामाचा आढावा घेण्यासाठी जाण्यापूर्वी त्या नेताजी सुभाषचंद्र बोस आंतरराष्ट्रीय विमानतळावर पत्रकारांशी बोलत होत्या. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थिनी, विशेषतः ज्या राज्याबाहेरून शिक्षण घेण्यासाठी पश्चिम बंगालमध्ये आल्या आहेत, त्यांनी वसतिगृहाचे नियम पाळणे अपेक्षित आहे.

## निवडक आक्रोशावर प्रश्नचिन्ह

विद्यार्थिनींना हवे तिथे जाण्याचा मूलभूत अधिकार असला तरी त्यांनी उशिरा बाहेर पडणे टाळावे. प्रत्येक व्यक्तीच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी पोलिसांना काही मर्यादा आहेत. रात्री कोण घराबाहेर पडत आहे हे पोलीस अधिकाऱ्यांना माहीत नसते आणि ते प्रत्येक घराचे ते रक्षण करू शकत नाहीत, असे ममता म्हणाल्या.दरम्यान, मुख्यमंत्र्यांनी अशा गुन्ह्यांबद्दलच्या 'निवडक आक्रोशा'वर प्रश्नचिन्ह उपस्थित केले .

## नितीश कुमारांनी भाजपाला दिलं बरोबरीचं स्थान

# बिहारमध्ये दोन टप्प्यात मतदान होणार असून निकाल 14 नोव्हेंबरला

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बिहारमध्ये पुढील महिन्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी एनडीएने जागावाटपाचा फॉर्म्युला जाहीर केला आहे. यामध्ये भाजपा आणि संयुक्त जनता दल २४३ सदस्यांच्या विधानसभेत प्रत्येकी १०१ जागांवर लढणार आहेत. याचबरोबर एनडीएचा भाग असलेल्या केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांच्या लोक जनशक्ती पार्टी (रामविलास) यांना २९ जागा देण्यात आल्या आहेत.**



तर राष्ट्रीय लोक मोर्चा आणि हिंदुस्थानी अवाम मोर्चा यांना प्रत्येकी ६ जागा देण्यात आल्या आहेत. या जागावाटपाबाबतची घोषणा केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज (रविवारी) केली.२०२० मध्ये झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत ११५ जागा लढवणाऱ्या, मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त जनता दलाच्या यंदा १४ जागा कमी झाल्या आहेत. तर, भाजपाच्या ९ जागा कमी झाल्या आहेत.

गेल्या निवडणुकीत भाजपाने ११० जागा लढवल्या होत्या. गेल्या वेळी केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांच्या लोक जनशक्ती पार्टीने (रामविलास) स्वतंत्रपणे निवडणूक लढवली होती. विधानसभा निवडणुकीत संयुक्त जनदा दल पहिल्यांदाच भाजपापेक्षा जास्त जागा लढवणार नाही.

गेल्या वर्षी हरियाणामध्ये भाजपाला सलग तिसऱ्यांदा विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे बिहार निवडणूक प्रभारी धर्मेंद्र प्रधान म्हणाले की, बिहारमधील एनडीएच्या मित्रपक्षांनी जागावाटपाचे स्वागत केले आहे.

## मित्रपक्षांनी मैत्रीपूर्ण वातावरण

"एनडीएच्या मित्रपक्षांनी मैत्रीपूर्ण वातावरणात जागांचे वाटप पूर्ण केले आहे. एनडीएच्या सर्व पक्षांचे कार्यकर्ते आणि नेत्यांनी याचे स्वागत केले आहे. राष्ट्रीय जनता दल यांच्यातील जागावाटपाच्या कथित वादाच्या पार्श्वभूमीवर, राजद नेते तेजस्वी यादव आणि काँग्रेसचे अखिलेश प्रसाद सिंह विमानात गप्पा मारतानाचा एक फोटो व्हायरल झाला. लालू प्रसाद यादव आणि तेजस्वी यादव ज्या विमानाने प्रवास केला होता.

# ‘हुंडा घेणारे नामर्द, भिकमाग्यासारखे..!’-मकरंद अनासपुरेंचं परखड मत

अकोला जिल्ह्यातील निंबा फाटा येथे ‘अंदुरा ॲग्रो प्रोड्युसर कंपनी’च्या वतीने ‘कुणबी स्नेहमिलन सोहळा’ आणि शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला चित्रपट अभिनेते मकरंद अनासपुरे उपस्थित होते. यावेळी बोलताना अनासपुरे यांनी हुंडा घेणारे नामर्द आहेत असं विधान केलं आहे. अकोला जिल्ह्यातील निंबा फाटा येथे ‘अंदुरा ॲग्रो प्रोड्युसर कंपनी’च्या वतीने ‘कुणबी स्नेहमिलन सोहळा’ आणि शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला चित्रपट अभिनेते मकरंद अनासपुरे आणि अभिनेत्री गिरिजा ओक उपस्थित होत्या. यावेळी बोलताना मकरंद अनासपुरे यांनी हुंडा घेणारे नामर्द आहेत. जर स्त्री जर टिकली नाही तर, समाज कसा टिकेल? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला. मकरंद अनासपुरे आपल्या भाषणात नेमकं काय म्हणाले ते सविस्तर जाणून घेऊयात.



आपल्या भाषणात मकरंद अनासपुरे म्हणाले की, ‘जे हुंडा घेतात ते नामर्द आहेत असं माझं वैयक्तिक मत आहे. बायको लक्ष्मी म्हणून घरात आणायची. तिने आपल्या लेकरांना जन्म द्यायचा, तिने त्यांच्यावर संस्कार करायचे, मग ती घरात येताना भिकमाग्यासारखे तिच्या बापाकडे पैसे कशाला मागायचे? काय गरज आहे त्याची. उद्या जर स्त्री टिकली नाही तर समाज कसा टिकेल? आपल्या देशाचं नाव भारत. आपण काय म्हणतो, भारत माता की जय. भारत हा पुल्लिंगी शब्द आहे. पण आपण भारत माता म्हणतो त्याचे कारण म्हणजे, आदिशक्तीचे महत्त्व आपल्या सर्वांना समजलेलं आहे. जुन्या माणसांना हे समजलं त्यामुळे त्यांनी भारत माता म्हटले आहे.’

शेतकरी एकत्र आल्याशिवाय त्यांचे प्रश्न सुटणार नाहीत


शेतकऱ्यांच्या प्रश्नावर उत्तर शोधण्यासाठी मकरंद अनासपुरे आणि नाना पाटेकरांनी एकत्रित ‘नाम फाउंडेशन’ची स्थापना केली आहे. या कार्यक्रमात शेतकऱ्यांबाबत बोलताना मकरंद अनासपुरे म्हणाले की, ‘शेतकरी एकत्र आल्याशिवाय त्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. शेतकरी बांधवांनी एकच जात यापुढे लक्षात ठेवायची ती म्हणजे शेतकरी. सगळ्यांनी मिळून काम केलं तर उभ राहण्याची शक्यता आहे. साधे मुद्दे आहेत, साधे गणितं आहेत.

# सावली बदलणार भविष्याची दिशा

'प्रतिसोध - झुंज अस्तित्वाची' ही छोट्या पडद्यावरील लोकप्रिय मालिका आहे. गेल्या काही दिवसांपासून ही मालिका प्रेक्षकांचं चांगलच मनोरंजन करत आहे. आता ही मालिका रंजक वळणावर आली आहे. या मालिकेत आता एका नव्या पात्राची एन्ट्री होणार आहे.'प्रतिशोध' झुंज अस्तित्वाची' ही मालिका सध्या रंजक वळणावर येऊन ठेपली आहे. मालिका प्रेक्षकांच्या पसंतीस उतरते आहे. 'प्रतिशोध' ही मालिका आई आणि मुलगी यांच्या विशिष्ट नात्यावर भाष्य करणारी थरारक मालिका आहे. तृतीयपंथी आई आणि दिशा नावाची मुलगी यांचं नातं आणि त्यांचा संघर्ष यांची कहाणी या मालिकेतून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. ममता एम.डी. झालेली आहे आणि दिशा तिची मुलगी आहे हे सिद्ध करण्यासाठी तिला झटावे लागते आहे. सत्यजित राहण्यासाठी तिला हे साध्य करणे फार महत्त्वाचे आहे.

# अनुष्काच्या बाळाचा जन्म?

बॉलीवूड अभिनेत्री अनुष्का शर्मा व भारतीय फलंदाज विराट कोहली लोकप्रिय कपल आहे. सोशल मीडियावर दोघे मोठ्या प्रमाणावर सक्रिय असतात. निरनिराळे फोटो व व्हिडीओ शेअर करत ते चाहत्यांना अपडेट देत असतात. गेल्या काही दिवसांपासून अनुष्का दुसऱ्यांदा गरोदर असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. लवकरच अनुष्का दुसऱ्यांदा आई होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. आता अनुष्काच्या दुसऱ्या गरोदरपणाबाबत उद्योगपती हर्ष गोयंका यांनी एक क्रिप्टिक ट्विट केले.भारताचे प्रसिद्ध उद्योगपती हर्ष गोयंका यांनी आपल्या ट्वीटमध्ये (एक्स) एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी अनुष्का व विराटच्या दुसऱ्या बाळाबाबत भाष्य केले आहे. गोयंका यांनी पोस्टमध्ये लिहिले आहे. एक नवीन बाळ काही दिवसांत जन्माला येणार आहे. आशा आहे की हे बाळ त्याच्या वडिलांसारखं क्रिकेटचं मैदान गाजवेल किंवा आईसारखं फिल्मस्टार होईल? या पोस्टबरोबर त्यांनी काही हॅशटॅगही वापरले आहेत. त्यांनी मेड इन इंडिया, टू बी बॉर्न इन लंडन हॅशटॅग वापरले आहेत.गोयंका यांची पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली आहे. या पोस्टवरून विराट व अनुष्काचे दुसरे मूल भारतात नाही तर लंडनमध्ये जन्माला येणार असल्याची चर्चा सुरू आहे.



# सुपरहिट शो 'शक्तिमान' का बंद करावा लागला?

90 च्या दशकात दूरदर्शनसह मोजक्याच खासगी टीव्ही चॅनेल होते. या काळात काही टीव्ही मालिकांनी प्रचंड लोकप्रियता मिळाली. काही मालिका आजही प्रेक्षकांच्या मनात घर करून आहेत. पहिला भारतीय सुपरहिरो मुकेश खन्ना यांनी 'शक्तिमान'च्या रुपाने टीव्हीवर आणला. 1997 साली सुरू झालेल्या मालिकेने टीव्हीवर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. सुरुवातीला शनिवारी आणि त्यानंतर रविवारी ही मालिका प्रसारित होत असे. शक्तिमान हे नाव या काळातील बच्चे कंपनीसाठीचे भावनिक नाते आहे. त्यामुळेच ही मालिका बंद झाली तेव्हा अनेकांना धक्का बसला. 90 च्या दशकात सुपरहिट असणारा शक्तिमान हा शो लोकप्रिय होता. त्यानंतर अचानकपणे हा शो बंद झाल्यानंतर लोकांना धक्का बसला. शो सुपरहिट होता, टीआरपी देखील होता. तरीदेखील निर्मात्यांनी शो का बंद केला असा प्रश्न अनेकांना पडला. अनेक वर्षांनंतर मुकेश खन्ना यांनी शो का बंद करावा लागला, याचे कारण सांगितले. मुकेश खन्ना यांनी कोरोनादरम्यान त्यांच्या यूट्यूब चॅनलवर याचे कारणच सांगितले. त्यांनी सांगितले की,'शक्तिमान सुरू झाले तेव्हा ते दूरदर्शनवर टेलिकास्ट करण्यासाठी 3 लाख रुपये दूरदर्शनच्या मालकाला देत होते. त्याला प्राइम टाइम मिळत नव्हता, त्याला मंगळवार रात्रीचा आणि शनिवारचा दिवसाचा स्लॉट मिळाला मुकेश खन्ना पुढे म्हणाले, 'मी हा शो मुलांसाठी बनवला होता आणि त्यांनी तो पाहिला नाही तर काही अर्थ नव्हता.

# अनंत-राधिकाच्या प्री-वेडिंग फंक्शनला सुरुवात

मुकेश अंबानी आणि नीता अंबानी यांच्या घरी लगीनघाईला सुरुवात झाली आहे. देशातील सर्वात श्रीमंत उद्योगती मुकेश अंबानी यांचा धाकटा मुलगा अनंत अंबानी लवकरच राधिका मर्चेंटसोबत लग्नबंधनात अडकणार आहे. अनंत-राधिका यांच्या प्री-वेडिंग कार्यक्रमांना आता सुरुवात झाली आहे. अनंत आणि राधिका यांच्या लग्नाच्या चर्चा सध्या जोरदार सुरू आहेत. लगन लखवानु या कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांच्या प्री-वेडिंग फंक्शला सुरुवात झाली आहे. नुकतचं गुजरात येथील जामनगरमध्ये अनंत आणि राधिका यांचा लगन लखवानु हा कार्यक्रम पार पडला आहे. या कार्यक्रमादरम्यान राधिका खूपच सुंदर दिसत होती. तिचे लक्षवेधी फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. लगन लखवानु या कार्यक्रमादरम्यान राधिका मर्चेंटने डिझायनर अनामिका खन्नाने डिझाईन केलेला लेहेंगा परिधान केला होता. या लेहेंग्यावरील फ्लोरल वर्क चाहत्यांच्या पसंतीस उतरलं आहे. या लूकमध्ये राधिका खूपच एलीगेंट दिसत होती. लेहेंग्यावर तिने हिऱ्याचा हार घातला होता. तिची लाल रंगाची टिकलीदेखील खूपच लक्षवेधी होती. कोणतीही भारी हेअरस्टाईल करण्यापेक्षा राधिकाने मोकळे केस ठेवायला पसंती दर्शवली. तसेच सटल मेकअपमध्ये राधिका खूपच सुंदर दिसत होती. अनंत अंबानी आणि राधिका मर्चेंट यांचं प्री वेडिंग कार्ड काही दिवसांपूर्वी व्हायरल झालं आहे. वेडिंग कार्डनुसार, 1 ते 3 मार्चदरम्यान अनंत आणि राधिका यांचा लग्नसोहळा चालणार आहे. या लग्नसोहळ्याला बॉलिवूडचे अनेक सेलिब्रिटी हजेरी लावणार आहेत. गुजरात येथील जामनगरमध्ये जुलैमध्ये ते लग्नबंधनात अडकणार असल्याचंही म्हटलं जात आहे.



**आयसीसी महिला वनडे वर्ल्डकप** ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी ३३१ धावांचे आव्हान

# ऑस्ट्रेलियाला दिली कडवी टक्कर!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयसीसी महिला वनडे वर्ल्डकप स्पर्धेत भारत आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही संघांमध्ये झालेल्या सामन्यात अटीतटीची लढत पाहायला मिळाली. भारतीय संघाने ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी ३३१ धावांचे आव्हान ठेवले होते. या धावांचा पाठलाग करताना शेवटच्या षटकात ऑस्ट्रेलियाने षटकार मारून विजयाची नोंद केली.**

## हेलीची १४२ धावांची दमदार खेळी



हा सामना ऑस्ट्रेलियाने ३ गडी राखून आपल्या नावावर केला. ऑस्ट्रेलियाला हा सामना जिंकण्यासाठी ३३१ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या ऑस्ट्रेलियाकडून कर्णधार आणि सलामीवीर फलंदाज एलिसा हेलीने १४२ धावांची दमदार खेळी केली. तर लिचफिल्डने ४० धावांची खेळी केली. भारतीय गोलंदाजांनी बेथ मुनी आणि सदरलँडला स्वस्तात माघारी धाडलं. पण गार्डनरने ४५ धावा करत ऑस्ट्रेलियाला पुनरागमन करून दिलं. शेवटी शेवटच्या षटकात षटकार मारून ऑस्ट्रेलियाने हा सामना ३ गडी राखून आपल्या नावावर केला. या सामन्यात धावांचा बचाव करताना भारतीय गोलंदाजांनी दमदार कामगिरी केली. पण थोडक्यात भारतीय गोलंदाज मागे पडले. भारतीय संघाकडून गोलंदाजी करताना एन चरणीने १० षटकात ४१ धावा खर्च करत ३ गडी बाद केले. तर अमनजोत कौरने ६८ धावा खर्च करत २ गडी बाद केले. दिप्ती शर्माने ५२ धावा खर्च करत २ गडी बाद केले.या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून भारतीय संघाला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं होतं. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाकडून सलामीवीर फलंदाज स्मृती मान्धना आणि प्रतिका रावल यांनी पहिल्या विकेटसाठी १५५ धावा जोडल्या. स्मृती मान्धनाने ८० धावांची खेळी केली. तर प्रतिका रावलने ७५ धावांची खेळी केली. हरलिन देओलने ३८ धावा केल्या. हरमनप्रीत कौरने २२ धावांची खेळी केली. जेमिमा रॉड्रिग्जने ३३ धावांची खेळी केली. ऋचा घोषने ३२ धावांची खेळी केली. भारताचा डाव ४८.५ षटकात ३३० धावांची खेळी केली.आयसीसी महिला वनडे वर्ल्डकप २०२५ स्पर्धेत भारताचा चौथा सामना ऑस्ट्रेलियाविरुद्ध सुरू आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाचा डाव ४८.५ षटकात ३३० धावांवर आटोपलातर झाले असे की, भारतीय संघाची फलंदाजी सुरू असताना ऑस्ट्रेलियाकडून २९ वे षटक टाकण्यासाठी सदरलँड गोलंदाजीला आली. त्यावेळी प्रतिका रावल स्ट्राइकवर होती. सदरलँडने ऑफ साईडच्या दिशेने स्लोवर चेंडू टाकला. या चेंडूवर प्रतिकाने स्लॉग स्वीप मारण्याचा प्रयत्न केला. पण तिचा प्रयत्न फसला. त्यावेळी चेंडू यष्टिरक्षकाच्या हातात गेला. हा चेंडू अडवणं फार कठीण नव्हतं. पण चेंडू टप्पा पडून फिरला. त्यामुळे यष्टिरक्षकाला अंदाज आला नाही. हा चेंडू हेल्मेटला जाऊन लागला. त्यामुळे भारतीय संघाला पेनल्टी म्हणून ५ धावा मिळाल्या. पण हे पाहून ऑस्ट्रेलियाची यष्टिरक्षक आणि फलंदाजालाही हसू आवरलं नाही.. या सामन्यात भारताकडून सलामीला आलेल्या प्रतिका रावल आणि स्मृती मन्धानाने दमदार सुरुवात करून दिली. दरम्यान या सामन्यात असं काही घडलं जे क्वचितच घडतं. हा सामना ऑस्ट्रेलियाने ३ गडी राखून आपल्या नावावर केला. ऑस्ट्रेलियाला हा सामना जिंकण्यासाठी ३३१ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या ऑस्ट्रेलियाकडून कर्णधार आणि सलामीवीर फलंदाज एलिसा हेलीने १४२ धावांची दमदार खेळी केली. मुनी आणि सदरलँडला स्वस्तात माघारी धाडलं. पण गार्डनरने ४५ धावा करत ऑस्ट्रेलियाला पुनरागमन करून दिलं. शेवटी शेवटच्या षटकात षटकार मारून ऑस्ट्रेलियाने हा सामना ३ गडी राखून आपल्या नावावर केला.या सामन्यात धावांचा बचाव करताना भारतीय गोलंदाजांनी दमदार कामगिरी केली. पण थोडक्यात भारतीय गोलंदाज मागे पडले.

### भारतीय गोलंदाजांची झुंज

दिप्ती शर्माने ५२ धावा खर्च करत २ गडी बाद केले.या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून भारतीय संघाला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं होतं. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाकडून सलामीवीर फलंदाज स्मृती मान्धना आणि प्रतिका रावल यांनी पहिल्या विकेटसाठी १५५ धावा जोडल्या. स्मृती मान्धनाने ८० धावांची खेळी केली.

# इंग्लंडच्या कर्णधाराने घडवला इतिहास!

## महिला क्रिकेटमध्ये 'हा' रेकॉर्ड करणारी जगातील पहिलीच क्रिकेटपटू

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयसीसी महिला वनडे वर्ल्डकप २०२५ स्पर्धेत वेस्टइंडिजचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. शनिवारी झालेल्या सामन्यात इंग्लंड आणि श्रीलंका हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात इंग्लंडने श्रीलंकेवर ८९ धावांनी विजय मिळवून विजयाची हॅट्रीक पूर्ण केली. या सामन्यात इंग्लंडची स्टार अष्टपैलू खेळाडू नॅट शिवर ब्रंटने दमदार कामगिरी केली.**




तिने इंग्लंडकडून पहिल्या डावात फलंदाजी करताना ११७ धावांची दमदार खेळी केली. हे तिच्या वर्ल्डकप कारकिर्दीतील ५ वे शतक ठरले आहे. दरम्यान या खेळीच्या बळावर इंग्लंडने ५० षटकांअखेर ९ गडी बाद २५३ धावा केल्या. श्रीलंकेला हा सामना जिंकण्यासाठी २५४ धावा करायच्या होत्या. या धावांचा बचाव करतानाही नॅट शिवर ब्रंटने मोलाचं योगदान दिलं. तिने धावांचा बचाव करताना ५ षटकं गोलंदाजी केली. यादरम्यान तिने अवघ्या २५ धावा खर्च केल्या आणि १ फलंदाजाला बाद करत माघारी धाडलं. तर कर्णधार सोफी एक्लेस्टनने १० षटक गोलंदाजी केली आणि अवघ्या १७ धावा खर्च करत ४ गडी बाद केले. या सामन्यात दमदार कामगिरी करून नॅट शिवर ब्रंटने मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे. या अष्टपैलू कामगिरीच्या बळावर नॅट शिवर ब्रंटने मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे. तिने या स्पर्धेत शतक आणि गोलंदाजी करताना २ गडी बाद करण्याचा पराक्रम केला आहे. या स्पर्धेच्या इतिहासात पाचव्यांदा असं घडलं आहे. पण मुख्य बाब अशी की, नॅट शिवर ब्रंटने वर्ल्डकप स्पर्धेच्या इतिहासात दुसऱ्यांदा अशी कामगिरी केली आहे.

### वेस्टइंडिजचा बोलबाला

वर्ल्डकप स्पर्धेच्या इतिहासात २ वेळा अशी कामगिरी करणारी ती पहिलीच महिला खेळाडू ठरली आहे. याआधी कुठल्याही खेळाडूला २ वेळा शतक आणि गोलंदाजी करताना २ गडी बाद करण्याचा पराक्रम करता आलेला नाही.आयसीसी महिला वनडे वर्ल्डकप २०२५ स्पर्धेत वेस्टइंडिजचा बोलबाला पाहायला मिळाला आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। सोमवार।

। दि. 13 ऑक्टोबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




### शिक्षण विश्व: मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी करावा

# नव तंत्रज्ञान आत्मसात करा -अच्युत गोडबोले!

## पीसीसीओईआर मध्ये बीटेक प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**या पुढील काळात विज्ञान तंत्रज्ञानात प्रचंड वेगाने बदल होत आहे. अवघ्या काही महिन्यांत नव नवीन तंत्रज्ञान विकसित होत असून विद्यार्थ्यांनी ते आत्मसात करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत; तरच भविष्यात आश्वासक प्रगती साध्य करता येईल. मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या विविध स्तरातील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी केला पाहिजे, असे मार्गदर्शन ज्येष्ठ तंत्रज्ञ, मार्गदर्शक, लेखक अच्युत गोडबोले यांनी केले..**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) येथे २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात बी. टेक. प्रथम वर्ष विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभात यावेळी अच्युत गोडबोले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. विजयकुमार जंगम शेट्टी, संग्राम निर्मळे, पीसीसीओईआरचे संचालक डॉ. हरीश तिवारी, पीसीईटीट्रेनिंग अॅन्ड प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. शीतलकुमार रवंदळे, विद्यार्थी, पालक, विविध विद्या शाखेचे अधिष्ठाता, प्राध्यापक उपस्थित होते.

यावेळी प्रथम वर्षात विशेष नैपुण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. या नंतरच्या सत्रात प्रा. विजयकुमार जंगम शेट्टी, संग्राम निर्मळे, माजी विद्यार्थीनी कविता बाळीवाडा, सुहानी चालमेती यांनीही मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी शिस्त, सातत्यपूर्ण ज्ञानार्जन, नवकल्पना आणि नैतिक मूल्ये जपली पाहिजेत. विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक यश नव्हे तर समाजासाठी जबाबदार अभियंता होण्याचे आवाहन केले, डॉ. शीतलकुमार रवंदळे यांनी केले.

विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध अभ्यास, कौशल्य विकास, करिअरच्या संधींबाबत प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांनी मार्गदर्शन केले.

पालकांसाठी विशेष संवाद सत्रही आयोजित करण्यात आले.

स्वागत प्रा. शीतल पाटील आणि आभार प्रा. प्रिया ओघे मानले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

### वाहनांच्या मालकांना अंतिम संधी देत, परत घेऊन जाण्याचे आवाहन

# जमा केलेली वाहने घेऊन जा, अन्यथा होणार लिलाव!

## 24 ऑक्टोबरपर्यंत कागदपत्रे दाखवून मालकांनी घ्यावीत स्वतःची वाहने



।पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहरात ठिकठिकाणी धूळखात पडलेली, रस्त्यांवर अडथळा निर्माण करणारी आणि वाहतुकीस अडथळा ठरणारी बेवारस वाहने आता पोलिसांच्या ताब्यात आहेत. शहर वाहतूक शाखेने मोठ्या प्रमाणावर ही वाहने जप्त करून मोशी येथील कचरा डेपोजवळील मोकळ्या मैदानात जमा केली आहेत. आता या वाहनांच्या मालकांना अंतिम संधी देत, वाहतूक विभागाने ती परत घेऊन जाण्याचे आवाहन केले आहे.**

२४ ऑक्टोबरपर्यंत कागदपत्रे सादर करून वाहन घेऊन न गेल्यास, या सर्व वाहनांचा लिलाव केला जाणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

**शहरात ठिकठिकाणी 'धूळखात' वाहने**

पिंपरी-चिंचवड हे औद्योगिक शहर गेल्या काही वर्षांत झपाट्याने वाढले आहे. पण, या वाढीबरोबरच शहरातील रस्त्यांवर, सोसायट्यांच्या बाजूला, मोकळ्या मैदानात आणि सार्वजनिक ठिकाणी अनेक जुनी, न वापरलेली वाहने उभी ठेवण्यात आली आहेत. काही वाहनमालकांनी त्याकडे दुर्लक्ष केले असून ती वर्षानुवर्षे त्याच ठिकाणी पडून आहेत. परिणामी परिसर विद्रूप होत आहे. वाहने बराच काळ एका जागी राहिल्याने ती गंजतात, सडतात आणि अर्धवट मोडकी होतात. त्यामुळे केवळ शहराचे सौंदर्यच नाही तर नागरिकांच्या आरोग्यालाही धोका निर्माण होतो. काही ठिकाणी या वाहनांमध्ये डास, साप किंवा अन्य प्राणीही आसरा घेतात. त्यामुळे या बेवारस वाहनांमुळे सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता आणि सुरक्षा या तिन्ही बाबींवर परिणाम होत आहे.

**पोलिसांची मोहीम — 'रस्ते मोकळे करा'**

या पार्श्वभूमीवर वाहतूक विभागाने गेल्या काही दिवसांपासून मोहीम हाती घेतली. शहरातील विविध भागांत फिरून, रस्त्यांवर अडथळा निर्माण करणारी आणि वापरात नसलेली वाहने पोलिसांनी जप्त केली. विशेषतः पिंपरी, चिंचवड, भोसरी, निगडी, चिखली आणि मोशी परिसरातून शेकडो दुचाकी, चारचाकी आणि मालवाहू वाहने उचलण्यात आली.

जप्त केलेली सर्व वाहने मोशी येथील कचरा डेपोजवळील मोठ्या मैदानात ठेवण्यात आली आहेत. मात्र, या मैदानात आता जागा अपुरी पडत असून नवीन जप्त वाहनांसाठी जागा मिळविणे कठीण झाले आहे. त्यामुळे पोलिसांनी संबंधित मालकांना आपली वाहने परत नेण्याचे आवाहन केले आहे.

**वाहनमालकांनी करावयाची प्रक्रिया**

वाहनमालकांना त्यांचे वाहन परत घ्यायचे असल्यास, त्यांनी १० ते २४ ऑक्टोबर या कालावधीत मोशी येथील वाहनतळावर भेट द्यावी. तिथे जाऊन आपले वाहन आहे का, याची खात्री करावी. त्यानंतर वाहनाची मूळ कागदपत्रे, चासी क्रमांक, आरटीओ क्रमांक यासह आवश्यक पुरावे सादर करावे. वाहनावरील जर काही प्रलंबित दंड किंवा शुल्क असेल, तर तो भरावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

यानंतर पोलिसांच्या परवानगीने वाहनमालक आपले वाहन परत घेऊन जाऊ शकतात. मात्र, ठरलेल्या मुदतीत वाहन घेऊन न गेल्यास २४ ऑक्टोबरनंतर ही सर्व वाहने कायद्यानुसार लिलाव प्रक्रियेत टाकली जाणार आहेत.

**“सडलेली वाहने हटवा – शहर स्वच्छ ठेवा”**

वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त विवेक पाटील म्हणाले, “मोशीतील वाहनतळावर सध्या मोठ्या प्रमाणावर बेवारस वाहने ठेवली आहेत. नागरिकांनी संबंधित कागदपत्रे दाखवून, प्रलंबित दंड भरून आपली वाहने घेऊन जावीत. अन्यथा २४ ऑक्टोबरनंतर त्यांचा लिलाव करण्यात येईल. या वाहनांमुळे शहरात अव्यवस्था आणि

### शहर सौंदर्यासाठी महत्त्वाची पाऊल

या उपक्रमामुळे शहरातील रस्ते मोकळे होतील, वाहतूक सुरळीत होईल आणि सार्वजनिक ठिकाणी पडून असलेल्या जुन्या वाहनांमुळे निर्माण होणारे प्रदूषण कमी होईल. तसेच नागरिकांनाही यामुळे स्वच्छ आणि नीटनेटके शहर मिळेल. वाहतूक विभागाने घेतलेली ही कारवाई नागरिकांसाठी एक संदेश आहे — “आपली जबाबदारी ओळखा आणि शहर स्वच्छ ठेवा.” २४ ऑक्टोबरपूर्वी वाहन घेऊन जा, अन्यथा त्याच वाहनाचा लिलाव होणार आहे!

---

# देवयानी कवळे हिची विभागीय पिस्तूल शूटिंग स्पर्धेसाठी निवड

## शिक्षण विश्व: एस. बी. पाटील पब्लिक स्कूलकडून कौतुक

।पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूल ची विद्यार्थिनी देवयानी आशिष कवळे हिची पिस्तूल शूटिंग स्पर्धेसाठी (सतरा वर्षाखालील) निवड झाली आहे.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा स्तरीय शालेय पिस्तूल शुटींग स्पर्धा २०२५- २६ चिखली येथील स्वामी विवेकानंद क्रिडा संकुल येथे झाल्या. या स्पर्धेत विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत कौशल्यपूर्ण सादरीकरण केले. यामध्ये एस. बी. पाटील पब्लिक स्कूल ची विद्यार्थीनी देवयानी कवळे हिने ४०० पैकी ३५२ गुण (१७ वर्षा खालील गटात) मिळवून तृतीय स्थान प्राप्त केले.

या कामगिरीमुळे देवयानी कवळे विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र ठरली आहे.

शाळेच्या प्राचार्या डॉ. बिंदू सैनी, उपप्राचार्या पद्मावती बंडा व क्रीडाशिक्षक, धनाजी पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट चे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी देवयानी कवळे हिचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26

### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |



Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046